
# भुरा; बुद्धिजीवी प्रवाशाची आत्मकथा

डॉ. नाना झगडे




पुस्तकाचे नाव : **भुरा**
लेखकाचे नाव : **प्रा.शरद बाविस्कर**
प्रकाशन : **लोकवाङ्मय गृह**
पृष्ठे : **३५४**
किंमत :५००/– रु.

'**भु**रा' हे शरद बाविस्कर यांचे लोकवाङ्मय गृह प्रकाशित आत्मकथन नुकतेच वाचले. या आत्मकथनात धुळे जिल्ह्यातल्या रावेर या गावातील कोरडवाहू शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या भुराची बुद्धिजीवी प्रवासाची कहाणी आहे. भुरा ते जेएनयू विद्यापीठात तत्त्वज्ञान व फ्रेंच भाषेचे प्राध्यापक डॉ. शरद बाविस्कर पर्यंतचा संघर्षमय बौद्धिक प्रवास या आत्मकथनात प्रकट झाला आहे. लेखकाचा 'बुद्धिजीवी प्रवास' हे या आत्मकथनाचे ठळक वैशिष्ट्य आहे.

शिक्षणावर दांडगी श्रद्धा ठेवून आपल्या पोरानं शिकावं, मोठं व्हावं, गरिबीचा पांग फेडावा, अशी प्रत्येक गरीब आईप्रमाणे भुराच्या आईचीही इच्छा असते. जीवनाच्या विद्यापीठातून आलेले शहाणपण हीच भुराच्या आईची श्रीमंती. तिची प्रत्येक कृती आणि उक्ती भुराचे ऊर्जा स्तोत्र ठरते. ''मनले नको लाईलिव भाऊ. हसणारास्ले हासू दे. लोकेस्नी घाण सवय ऱ्हास. सोतानी गांडले गू बदबद, पण कोणा पाय शेणमा पडना, तर हासतन खदखद.'' (पृ.८) अस्सल ग्रामीण, अहिराणी भाषेत आई भुराशी संवाद साधत राहते. ''जे आपल्या पकडीत येत नाही त्याला चहुबाजूने घेरावं लागते,'' असा आत्मविश्वास वाढवत ''झिजून मराणं, पण थिजीन नही मराणं!'' (पृ.३५४) भुराची आई म्हणजे बिनभिंतीचे विद्यापीठच. ती भुराला आयुष्याशी संघर्ष करण्याचे बळ देत राहते. ती वाचकाचेही आत्मबळ वाढवत राहते. शिक्षणाने होणाऱ्या बदलावर विश्वास ठेवून पोराला शिकवत राहते. भुराच्या आईत वाचकाला मॅक्झिम गॉर्की, उत्तम कांबळे यांची आई दिसायला लागते.

तीस वर्षांपूर्वीच्या खेड्यापाड्यातील शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक पटावर जात, वर्ग, लिंग, प्रांत या जाणिवेतून संवेदनशीलतेने मांडलेला भुराच्या बौद्धिक आयुष्याचा पट उलगडत जातो. इयत्ता दहावीत इंग्रजी विषयात नापास झालेला भुरा नैराश्याच्या गर्तेतून बाहेर पडण्यासाठी अंतर्मुख होत न्यूनगंडावर मात करतो. गावात स्वाध्याय, आसाराम, रामदासाच्या बैठकांतून सांस्कृतिक प्रभुत्वातून लोकांना मानसिकदृष्ट्या अंकित करत. त्यातून माणसाला भेडसावणाऱ्या प्रश्नांची उत्तरं तर मिळत नाहीतच; पण लोकांमध्ये शिक्षणाविषयीची उदासीनता व न्यूनगंड निर्माण होतो. इथून भुराचा आत्मशोध सुरू होतो.

'विद्यार्थिदशेपासून माझा पवित्रा चिकित्सक राहिला आहे म्हणजे आधी स्वतः व्यवस्थितपणे गोष्टी समजून घेणं आणि मग परिस्थितीनुसार निर्णय घेणं. कुठल्याही विचारधारेचं आंधळेपणाने समर्थन करायचं नाही आणि एखाद्या संघटनेला पाठिंबा दिला तर तिला चिकित्सातीत राहू द्यायचं नाही.' (पृ.१९८) सुरुवातीपासूनच चिकित्सक बाणा हा भुराचा स्थायिभाव. तुकारामांच्या 'सत्य सत्याशी मन केले ग्वाही' प्रमाणे रात्रंदिवस परिस्थितीशी संघर्ष करत राहतो. क्रेन सर्व्हिस, गॅरेजमध्ये गाड्या पुसणं, झाडू मारणं, चहा वाटणं, लाकडाची ढिमरे उचलणं अशी कामं करत शिक्षण घेत राहतो. या सगळ्या प्रवासात स्वत्वाची होणारी घुसमट प्रकट होते. त्याचबरोबर परिस्थितीशी दोन हात करण्याची वृत्तीही प्रबळ होते.

देव, धर्म, कर्मकांड या विषयीची लेखकाची भूमिका स्पष्ट आहे. विषमतावादी, आणि निरर्थक धार्मिक कर्मकांडाबद्दल स्पष्ट मत व्यक्त करतो. 'माझा धर्म म्हणजे माझा नैतिक दृष्टिकोन. तो मला जबाबदार बनवतो. तो सम्यक स्वातंत्र्याचा पुरस्कार करतो. त्याला माझी पावलोपावली गुलामी अपेक्षित नाही आहे. तो पावलोपावली भीतीचं वातावरण निर्माण करून शेकडो कर्मकांड करायला भाग पाडून मला सर्व दृष्टीने गरीब करू इच्छित नाही. तो मला जीवनाला निर्भीडपणे जगायला शिकवतो आणि मानवी जीवनातील उतार – चढावांना सामोरे जाण्यासाठी नैतिक बळ देत असतो. 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले तोचि साधू ओळखावा देव तेथेचि जाणावा.' ह्या तत्त्वानुसार अर्थपूर्ण जीवन जगत होतो.' (पृ.३२०) पारंपरिक व्यवस्थेच्या साखळदंडांमध्ये बंदी होण्यापेक्षा साखळदंडांतून मुक्त होऊन स्वातंत्र्याची आस त्याला महत्त्वाची वाटते.

लेखक लग्नानंतर पहिल्यांदा पत्नीसोबत गावी आल्यानंतर भावाने ठेवलेल्या सत्यनारायणाच्या पूजेच्या वेळी ब्राह्मण पोराच्या पाया पडायला सांगिल्यावर राग अनावर होऊन बोलतो 'साला, काय दलिंदर समाज शे आपला!' (पृ.३२२) हेच ते जन्मावर आधारलेली जातीय श्रेष्ठत्व! एका प्राध्यापकाला ब्राह्मण पोराच्या समोर नतमस्तक व्हावं लागणे हे त्याच्या बौद्धिक मनाला पटत नाही. भारतीय समाज व्यवस्थेतील विषमतावादी रूढी परंपरा त्याला निरर्थक वाटतात. हीच सामाजिक विषमता नष्ट करण्यासाठी महात्मा फुले यांनी पहिले पाऊल उचलले. धर्माची चिकित्सा करून जातीव्यवस्थेतून निर्माण झालेल्या मानवी असमानतेला विरोध करून सामाजिक सांस्कृतिक गुलामगिरीला महात्मा फुले यांनी सुरुंग लावला. 'विद्येविना मती गेल्याने' समाज या गुलामगिरीत अडकला. विषमतामूलक, निरर्थक धार्मिक कर्मकांडाला विरोध करणे, नकार देणे हे खऱ्या अर्थाने शिक्षणाने आलेले आत्मभान होय. उच्च शिक्षण घेऊनही अशी भूमिका घेणारे दुर्मिळच.

दहावीत इंग्रजी विषयात नापास होऊनही पुढे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी तसेच फ्रेंच भाषा अवगत करण्यासाठीची प्रबळ इच्छाशक्ती व त्यासाठी केलेले प्रयत्न अनुकरणीय आहेत. भारतासह इटली, फ्रान्स, इंग्लंड अशा देश-विदेशांतून पाच मास्टर्सच्या पदव्या, पीएचडी, जेएनयूसारख्या विश्वविख्यात विद्यापीठात तत्त्वज्ञान, फ्रेंच भाषा विषयाचा प्राध्यापकापर्यंतचा वेगवेगळ्या शिष्यवृत्तींसह केलेला बौद्धिक प्रवास, ध्येयवाद व प्रयत्नवादाला तत्वज्ञानाची जोड देत प्रेरणादायी लेखन वाचकाचा आत्मविश्वास वृद्धिंगत करते.

शिक्षण हेच सामान्य माणसाच्या आत्मउद्धाराचे साधन असून शिक्षणच माणसाला सामाजिक प्रतिष्ठा बहाल करते म्हणून, परिवर्तनाचं साधन म्हणून शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन विकसित व्हायला हवा. भारतातील आणि परदेशातील अध्ययन आणि अध्यापन यात लेखकाला तफावत जाणवते. भारतात व भारताबाहेर